महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ०२ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १०० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी



## दि.बा. पाटलांचे नाव न दिल्यास लाखोंचा मोर्चा

### खासदार बाळ्या मामांचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे ८ ऑक्टोबरला लोकार्पण होणार आहे. परंतु विमानतळाच्या नामकरणाचा मुद्दा पेटला असून भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्यामामा) यांनी सरकारला इशारा दिला आहे. दिवंगत लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव विमानतळाला देण्याचा निर्णय झाला नाही तर ६ ऑक्टोबरला मोर्चा काढू असे म्हात्रे यांनी सांगितले. तसेच या मोर्चात दोन ते तीन लाख भूमिपूत्र या आंदोलनात सहभागी होतील असा दावाही त्यांनी केला.

नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ व्हावे अशी मागणी ठाणे, मुंबई, नवी मुंबईतील भूमिपूत्र करत आहेत. विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण ८ ऑक्टोबरला होणार आहे. परंतु विमानतळाच्या नावाबाबत अद्यापही निर्णय झालेला नाही. त्यामुळे बुधवारी भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी ठाण्यात पत्रकार परिषद घेतली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठवला होता. मी त्याचा पाठपुरावा केल होता, दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव विचारधीन असल्याचे उत्तर केंद्र सरकारकडून मिळाले होते.

# लालपरीची भाडेवाढ रद्द !





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने दिवाळी हंगामात १० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, अतिवृष्टीमुळे राज्यात अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. परिणामी, पूरग्रस्तांना बाहेरगावी जाण्यासाठी एसटीच्या दरवाढीला चटका सहन करावा लागण्याची शक्यता होती. याबाबतची वृत्ते सर्वच प्रसिद्धी माध्यमातून मंगळवारी प्रसिद्ध झाल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी एसटीने केलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचे निर्देश दिले.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी दिवाळी हंगामात १५ आक्टोबर ते ५ नोव्हेंबरदरम्यान एसटीने १० टक्क्यांची हंगामी भाडेवाढ केली होती. परंतु, परतीच्या पावसामुळे आलेल्या पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य जनतेला सोसावा लागणाऱ्या आर्थिक भाराचा विचार करून एकनाथ शिंदे यांनी ही भाडेवाढ रद्द करावी, अशी सूचना परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना केली. त्यानुसार सरनाईक यांनी दिलेल्या निर्देशानुसार महामंडळाने भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी जाहीर केल्यानुसार १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत साधी, निमआराम (हिरकणी), शयन आसनी, वातानुकूलित शिवशाही आणि जनशिवनेरी अशा सर्व बसगाड्यांमध्ये १० टक्के भाडेवाढ लागू होणार होती. परंतु, आता प्रवाशांना अतिरिक्त भाडे मोजावे लागणार नाही.



# शिंदेंच्या शिवसेनेने दसरा मेळाव्याचे ठिकाण बदलले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर्षीच्या शिवसेना दसरा मेळाव्याबाबत एक मोठी घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले की, यावर्षी ही मेळावा दक्षिण मुंबईतील आझाद मैदानाऐवजी गोरेगाव येथील नेस्को प्रदर्शन केंद्रात आयोजित केला जाईल. मुंबई महानगर प्रदेशातील फक्त शिवसेनेचे कार्यकर्ते या मेळाव्यात सहभागी होतील. तर राज्याच्या इतर भागातील कार्यकर्ते पूर आणि अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या भागात मदत कार्यासाठी तैनात केले जातील.

पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, यावर्षीचा शिवसेनेचा दसरा मेळावा मुंबईच्या आझाद मैदानात न होता गोरेगाव येथील नेस्को प्रदर्शन केंद्रात आयोजित केला जाईल. महाराष्ट्रातील नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर, मुंबई आणि ठाण्याबाहेरील पक्षाच्या कार्यकर्त्यांना मुंबईतील मेळाव्याला उपस्थित न राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तर त्यांच्या संबंधित जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याचे आणि त्यांचा दसरा आणि दिवाळीचा उत्सव अधिक चांगल्या प्रकारे साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले की, शिवसेना शेतकऱ्यांना सतत मदत पाठवत आहे. म्हणूनच रॅली आझाद मैदानावरून नेस्को सेंटरमध्ये हलवण्यात आली आहे. आमचे कार्यकर्ते सर्व पूरग्रस्त भागात जातील आणि गरजूंना मदत करतील, असेही त्यांनी सांगितले. पूर आणि पावसामुळे बाधित भागातील कामगारांना मुंबईत येऊ नये असे सांगण्यात आले आहे. दसरा रॅलीत फक्त मुंबईतील शिवसैनिक सहभागी होतील.

शिवसेनेचे प्रवक्ते गुलाबचंद्र दुबे आणि अरुण सावंत यांनी सांगितले की, ही रॅली मूळतः आझाद मैदानावर होणार होती. परंतु एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांना पाठिंबा जाहीर केला. मुंबई आणि ठाण्याबाहेरील त्यांच्या कार्यकर्त्यांना रॅलीला उपस्थित राहू नये असे सांगितले. शिवसेना शेतकऱ्यांना सतत पाठिंबा देत आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे गटाचा दावा आहे की, एकनाथ शिंदे आझाद मैदानावर गर्दी जमवू शकले नाहीत, म्हणून रॅली नेस्को सेंटरमध्ये हलवण्यात आली.

# शहाड पुलावरुन अवजड वाहतूक सुरुच !

### ठराविक वाहनांना प्रवेश - स्थानिकांमध्ये संताप



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : कल्याण अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर शहाड येथील रेल्वे उड्डाणपुलावर देखभाल दुरूस्ती सुरू असल्याने येथून अवजड वाहनांना बंद घालण्यात आली आहे. मात्र काही मोजक्या अवजड वाहनांना येथून प्रवास करू दिला जात असल्याची बाब उघडकीस आली आहे. त्यामुळे वाहनचालकांत संतापाचे वातावरण आहे. स्थानिक कंपन्यांची ही वाहने असल्याचे वाहतूक पोलिसांकडून सांगितले जाते आहे.

शहाड येथील रेल्वे उड्डाणपूल हा कल्याण अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील सर्वाधिक वर्दळीचा आणि महत्वाचा उड्डाणपूल आहे. दोन शहरांना हा उड्डाणपूल असला तरी कल्याण, ठाणे, भिवंडी, मुंबई या शहरांकडे येजा करण्यासाठी हा पूल गरजेचा आहे. मात्र या पुलावर गेल्या काही वर्षात सातत्याने खड्डे पडत आहेत. काही महिन्यांपूर्वी या उड्डाणपुलाला थेट भगदाड पडल्याने थेट पुलाखालील रस्ता दिसू लागला होता. त्यानंतर या पूलाचा काही भाग बंद करण्यात आला होता. त्यानंतर या पुलाची देखभालदुरूस्ती केली गेली. पर्याय नसल्याने याच मागनि वाहनचालकांना प्रवास करावा लागतो. या पुलाच्या देखभाल दुरूस्तीच्या कामाला आता सुरूवात करण्यात आली आहे.

या पुलाच्या नुतनीकरणाचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी २८ सप्टेंबरपासून ते १५ ऑक्टोबरपर्यंत या मार्गावर वाहनांना बंदी घालण्यात आली होती. तशा आदेश काढण्यात आला. आहे.

# ‘गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी आम्ही सगळे कटीबद्ध’

## - ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** (०१) : ठाणे महानगरपालिकेचा ४३वा वर्धापन दिन आज, बुधवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महापालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते महापालिका ध्वजाचे आरोहण झाले. त्यांच्यासोबत अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी आणि अग्निशमन विभागाचे प्रमुख गिरिश झळके उपस्थित होते.

त्यानंतर, अग्निशमन दल, सुरक्षा दल, एमएसएफ यांनी संचलन केले. या संचलनाचे नेतृत्व सुजीत रामचंद्र पस्ते, केंद्र अधिकारी, वागळे इस्टेट, अग्निशमन केंद्र आणि सागर सूर्यकांत शिंदे, केंद्र अधिकारी, पाचपाखाडी अग्निशमन केंद्र यांनी केले.

ध्वजारोहण व संचलन सोहळ्यानंतर, कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात महनीय नेत्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आयुक्त सौरभ


### ठाणे महापालिकेचा ४३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

राव यांनी अभिवादन केले. यावेळी, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त गजानन गोदेपुरे, उमेश बिरारी, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी उपस्थित होते.

वर्धापन दिन हा कर्तव्य भावनेची जाणीव करून देणारा दिवस असतो. ज्या जनसामान्यांसाठी या संस्थेची स्थापना झाली, त्यांचे हित व अहित लक्षात घेऊन काम करण्याची ऊर्जा देणारा हा दिवस आहे. ठाणे महापालिकेत काम करणाऱ्या प्रत्येकाची निती, धोरण, कामाची पद्धत लोकहितकारी असली पाहिजे. ठाणेकरांना गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी कटीबद्ध राहण्याची प्रतिज्ञा आम्ही सगळे आजच्या वर्धापन दिनी करतो आहोत, असे प्रतिपादन आयुक्त सौरभ राव यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केले. त्याचप्रमाणे, वर्धापन दिनाचे औचित्य साधून शहरातील महनीय नेत्यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी आणि अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांनी मासुंदा तलाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास तसेच, कोर्ट नाका येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्यासह उपायुक्त गजानन गोदेपुरे, उमेश बिरारी, शंकर पाटोळे, सहाय्यक आयुक्त सोपान भाईक आणि माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर उपस्थित होते.

### पत्रकारिता व समाजकारणातील ध्वजवाहक

# नाना पिसाट यांचे निधन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** : कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागात शिवसेनेचे विचार पोहोचविणारे, निर्भीड पत्रकार म्हणून जनतेच्या प्रश्नांना आवाज देणारे आणि समाजकारणाच्या क्षेत्रात ठसा उमटवणारे ज्येष्ठ शिवसैनिक दत्तात्रेय राजाराम पिसाट उर्फ नाना पिसाट (वय 87) यांचे निधन झाले. काल सायंकाळी टिटवाळा येथील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

नाना पिसाट यांच्या निधनाने ग्रामीण भागातील शिवसैनिक, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांत शोककळा पसरली आहे. शिवसेनेच्या स्थापनेपासूनच ते कट्टर शिवसैनिक म्हणून ओळखले जात. त्यांच्या प्रभावी वक्तृत्व शैलीमुळे आणि धारदार लिखाणशैलीमुळे त्यांनी कल्याण तालुक्यातील गावोगाव शिवसेनेची मशाल तेवत ठेवली. ग्रामीण भागात संघटन बळकट करण्यासाठी आणि विचारांचे रोपण करण्यासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले.

पत्रकारितेच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे होते. प्रामाणिक, निर्भीड आणि जनतेच्या प्रश्नांना अग्रक्रम देणारे पत्रकार म्हणून त्यांनी मान्यता मिळवली. अनेक स्थानिक प्रश्न, अन्याय आणि समस्या त्यांनी आपल्या लेखणीद्वारे उघडकीस आणल्या व दुर्लक्षित घटकांच्या बाजूने उभे राहिले. त्यांच्या लिखाणाने असंख्य नागरिकांना हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा मिळाली.

नाना पिसाट यांनी अनेक होतकरू तरुणांना पत्रकारितेत मार्गदर्शन केले. प्रामाणिकपणा, समाजाशी बांधिलकी आणि कार्याची निष्ठा या मूल्यांचा वारसा त्यांनी तरुण पिढीला दिला. त्यामुळे ते आजही अनेकांसाठी आदर्श ठरले आहेत. त्यांच्या जाण्याने कल्याण तालुका आणि ग्रामीण भागाने एक प्रभावी वक्ता, निर्भीड पत्रकार आणि समाजासाठी झटणारा कट्टर शिवसैनिक गमावला आहे. त्यांचे आयुष्य आणि कार्य आगामी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

JEEVANDEEP SHAIKSHANIK SANSTHA POI'S
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GOVELI
Tal. Kalyan, Dist- Thane 421103
Permanently Affiliated to University of Mumbai
NAAC Reaccredited "B" Grade
Admission started for Arts, Commerce, Science & Professional Courses
2025-26 ADMISSION OPEN
UNDER GRADUATE
B.A.: Marathi, English, Economic, History, Sociology, Geography, Political Science
B.Com: General
B.Com: Account & Finance
B.Sc.: Chemistry
B.Sc.: Maths
B.Sc.: Information Technology
B.Sc.: Data Science
B.A.M.M.C.: Mass Media
B.M.S.: Management Studies
POST GRADUATE
M.A.: Marathi, History, Sociology, Economic, Geography
M.Com.: Advanced Accountancy
M.Sc.: Chemistry Organic
M.Sc.: Analytical
M.Sc.: Information Technology
M.A. C & J: Mass Media
ज्ञानगंगा घरोघरी
Y.C.M.O.U. COURSES
M.Sc. (Chemistry) M. A. - Yoga
DCM - Diploma in Co-operative Management
DCA - Diploma in Computer Applications
B. lib - Library Science
MBA - In H. R., Finance, Production, Marketing
SKILL DEVELOPMENT COURSE
DMLT
Fire & Safety
Construction Supervisor
Photography
Yoga Teacher Training GDA
Nursing Course,
Tally
Tailoring,
English Speaking
Advance Beautician
Social Media
Incubation & Innovation Center
For more information : 7021995158 I 8108559566
Email - goveli_jssp@rediffmail.com
website :www.jeevandeepcollegegoveli .in

रामायु पंचकर्म हॉस्पिटल व वेलनेस सेंटर
“आपल्या आरोग्याचा नैसर्गिक मार्ग – आमच्या आयुर्वेद रुग्णालयात!”
आमच्याकडे उपलब्ध सेवा
पंचकर्म चिकित्सा
आयुर्वेदिक औषधोपचार
जीवनशैली सल्ला (Ahar-Vihar मार्गदर्शन)
डिटॉक्स थेरपी
स्त्रीरोग व प्रसूती उपचार
त्वचारोग व संधिवात उपचार
डायबेटीस व स्थूलता नियंत्रण
मानसिक आरोग्य सुधारणा
आमची वैशिष्ट्ये
नैसर्गिक व शुद्ध औषधोपचार
स्वच्छ व शांत उपचार कक्ष
रोगमुक्ती आणि आरोग्य संवर्धनासाठी विशेष कार्यक्रम
आता आयुर्वेद उपचार आपल्या टिटवाळ्यात
9920377799
ईमेल: ramayupanchakarma@gmail.com
डॉ.प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (B.A.M.S, M.D Ayurveda)
संपर्क करा : पत्ता: रामायु पंचकर्म हॉस्पिटल व वेलनेस सेंटर, साईबाबा मंदिर रोड, महागणपती मंदिराजवळ, टिटवाळा (पू.)



# नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज भरण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील टॉप क्लास विद्यालयांच्या याद्या या कार्यालयास प्राप्त झालेल्या असून यादीतील सन. 2022-23, 2023-24 आणि 2024-25 या शैक्षणिक वर्षामध्ये ज्या विद्यालयांनी बोर्ड परीक्षेमध्ये सतत 100 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण असा निकाल प्राप्त केलेला आहे. अशा विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी Top Class Education in School For OBC, EBC DNT Student Under PM YSHSVI-reg. या योजनेंतर्गत ओबीसी, ईबीसी, व डीएनटी प्रर्वगातील गुणवंत विद्यार्थ्यांना इयत्ता 9 वी व 10 वी करीता रक्कम रूपये 75,000/- शिष्यवृत्ती व इयत्ता 11 वी व 12 वी करीता रक्कम रूपये 1,25,000/- शिष्यवृत्ती मिळेल.

**अर्ज प्रक्रिया** :- राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल वर ऑनलाईन अर्ज करणे. अटी व निरीक्षण - आधार लिंक केलेली उपस्थिती प्रणाली आवश्यक. विशेष बाबी - 8 वी 9 वी च्या गुणांवर आधारीत मेरीट यादी.

**अर्ज प्रक्रिया** :- शिष्यवृत्ती ची रक्कम डीबीटी द्वारे थेट विद्यार्थ्याच्या खात्यात जमा. अटी व निरीक्षण - नियमित उपस्थिती व समाधान कारक शैक्षणिक प्रगती आवश्यक. विशेष बाबी - 10 वी व 11 वीच्या गुणांवर आधारित मेरीट यादी.

**अटी व निरीक्षण** - इतर शासकीय योजनेंतर्गत एकाच उद्देशासाठी दुहेरी लाभ घेता येणार नाही.

नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर सुरु आहे. पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज मुख्याध्यापक यांच्यामार्फत नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर भरण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक समाधान इंगळे यांनी केले आहे.

# वाईटावर चांगल्याचा विजय म्हणजे दसरा

दसरा सण हा हिंदू धर्मात साजरा केला जाणारा महत्त्वाचा सण. दसऱ्याला विजयादशमी असेही म्हणतात. देशभरात लोक मोठ्या उत्साहाने दसरा हा सण साजरा करतात. या उत्सवाचा आनंद लुटण्यासाठी विद्यार्थ्यांना दसऱ्याच्या दिवशी सुटी मिळते.

**दसरा सणाचा इतिहास-**

दसरा हा दिवाळीच्या दोन ते तीन आठवड्यांच्या आधी येतो. दसऱ्याला भारतातील काही प्रदेशांमध्ये विजयादशमी म्हणूनही ओळखले जाते. जर आपण प्रादेशिक फरक बाजूला ठेवला तर, या उत्सवाच्या मागचे एकच मुख्य कारण आहे, ते म्हणजे वाईटावर चांगल्याचा विजय होतो. आणखी सोप्या शब्दांत सांगायचं तर दसरा हा सण वाईट शक्तीवर चांगली शक्ती नेहमी विजयी होते असा संदेश देतो. दसऱ्याच्या दोन कथा आहेत. दसरा हा शब्द 'दस' आणि 'हरा' या दोन हिंदी शब्दांपासून बनलेला आहे, जिथे दसचा अर्थ १० डोके असलेला रावण, आणि हरा म्हणजे पराजय असा होतो. दसऱ्याच्या दिवशी या दहा डोक्याच्या दुष्ट रावणाचा भगवान रामाने वध केला, आणि वाईटावर चांगल्याचा विजय झाला म्हणून या दिवसाला दसरा म्हणतात.

नवरात्रीच्या नवव्या माळीनंतर दहावा दिवस म्हणजे दसरा येतो. म्हणून हिंदू पौराणिक कथांमध्ये असे म्हटले जाते की या दिवशी देवी दुर्गेने महिषासुर नावाच्या राक्षसाचा वध केला होता. त्याला पृथ्वीतलावरून नष्ट केले होते म्हणून आपण दसरा साजरा करतो. अशा प्रकारे आपण जर दोन्ही कथा पहिल्या तर त्यातून एकच बोध मिळतो. अंधारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा आणि वाईटावर चांगल्याचा नेहमी विजय होतो

**दसरा आणि विजयादशमी सण कसा साजरा केला जातो?**

दसरा या सण संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी रावणाचा पुतळा बनवून त्याचे दहन केले जाते. अनेक ठिकाणी नाटकांचे प्रयोग होतात. त्यातून श्रीराम आणि रावण यांच्यामध्ये दहा दिवस चाललेल्या लढाईची कहाणी नाट्य स्वरूपात दाखवली जाते. या नाट्यरूपाला राम-लीला असे म्हणतात.



या नाटकांमध्ये नाटककार मुखवटे घालून आणि विविध नृत्य प्रकारांद्वारे ही राम-लीला साकारतात आणि दसऱ्याचे महत्व लोकांना पटवून देतात. बंगालमध्ये दसऱ्याला विजयादशमी, बिजॉय दशमी म्हणून ओळखले जाते. विजय आणि दशमी म्हणजेच्या दहाव्या दिवशी मिळालेला विजय असा याचा अर्थ होतो. हा दुर्गापूजेचा दहावा दिवस असतो. या दिवशी देवीची मूर्ती नदीत विसर्जित करण्यासाठी भव्य मिरवणुकीत काढल्या जातात.

**रावणाच्या पुतळ्याचे दहन-**

दसऱ्याच्या दिवशी देशात अनेक ठिकाणी रावणाचे मोठ्या आकाराचे पेपरबोर्डचे पुतळे बनवले जातात. त्यानंतर ते जाळण्यासाठी ते स्फोटकांनी भरतात आणि तो पुतळा जाळतात. हा कार्यक्रम हजारो प्रेक्षकांसह मोकळ्या मैदानात पार पाडला जातो. ज्यात सर्व वयोगटातील लोक या जत्रेचा आनंद घेतात. दसऱ्याच्या या आतषबाजीचे साक्षीदार होतात आणि आकर्षक दृष्यांनी मंत्रमुग्ध होतात. लहान मुले दसऱ्याचा कार्यक्रम पाहण्यासाठी पालकांना घेऊन जाण्याचा आग्रह धरतात.

# मुरबाड नगरपंचायतीच्या वतीने आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता





**मुरबाड** : 28 सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन असून त्या अनुषंगाने देशभरातील विविध शासकीय कार्यालये व आस्थापना मध्ये माहिती अधिकार दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

मुरबाड नगरपंचायत प्रशासनाच्या वतीनेही मुख्याधिकारी मनोज म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली 29 सप्टेंबर रोजी नगरपंचायत कार्यालयात अधिकारी व कर्मचारी यांचे चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते.नागरिकांना माहिती अधिकार अधिनियम कायद्यातील तरतुदी, कार्यपद्धती यांची दृकश्राव्य माध्यमातून प्रसिद्धी देण्यात आली.तसेच न्यू इंग्लिश स्कूल मुरबाड मधील शैक्षणिक संस्थेत विद्यार्थ्यांना माहिती अधिकार कायदा या विषयावर आधारित विद्यार्थ्यांना चित्रकला, निबंध तसेच वक्तृत्व स्पर्धेचे व व्याख्यान मालेचे आयोजन करून विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले.

# भिवंडी- वाडा रस्ता उपोषणास व्यापक प्रतिसाद




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**झिडके–अंबाडी** : गेल्या पंधरा वर्षांपासून भिवंडी- वाडा या रस्त्याच्या अत्यंत दुरावस्थेमुळे आणि सार्वजनिक बांधकाम विभाग (पी.डब्लू.डी) यांच्या अक्षम्य दुर्लक्षपणामुळे आत्तापर्यंत शेकडो निरपराध नागरिकांचे बळी ठरलेल्या रस्त्याच्या विषयाबाबत भिवंडी तालुक्यातील अंबाडी नाका येथे आज दिनांक-30/90/2025 रोजी जनआंदोलन समितीचे प्रमुख निमंत्रक सामाजिक युवा डॅशिंग कार्यकर्ते प्रमोद पवार यांनी आपल्या असंख्य सहकार्यासह आमरण उपोषण सुरू केले आहे.या उपोषणास परिसरातील बहुसंख्य नागरिक,विविध क्षेत्रातील कार्यकर्ते आणि संघटना यांचा व्यापक स्वरूपातील पाठींबा मिळत असून,या शांततापूर्ण उपोषणास कितपर्यंत यश मिळते हे येथील जनतेला पाहावे लागेल यात शंकाच नाही.कारण भिवंडी- वाडा या अंत्यत जीवघेणा रस्ता चांगल्या स्वरूपाचे काम होण्यासाठीच आत्तापर्यंत तब्बल 23 आंदोलने केली आहेत,परंतु शासनाकडून ठोस अशी भूमिका ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई न झाल्यामुळेच येथील जनतेचा पूर्णतः भ्रमनिरास होऊन संताप व्यक्त केला जात आहे.हा विषय गेल्या अनेक वर्षांपासूनचा सतावणारा असल्यामुळेच येथील रस्त्याने दैनंदिन प्रवास करणारे प्रवासी शारिरीक दृष्टीकोनातून निकामी झाले आहेत,तसेच विविध वाहनांतून प्रवास करणारे प्रवासी आपला जीव धोक्यात घालून प्रवास करीत असताना या रस्त्यावर केव्हा काही होईल याची शाश्वती नसूनही आपल्या रोजी-रोटी,व्यवसाय तसेच इतर महत्त्वपूर्ण कामकाजासाठी प्रवास करताना नाइलाजास्तव घराबाहेर पडत आहेत,यातूनच अधिकृत माहितीवरून जवळपास 600 निरपराध नागरिकांचे बळी गेल्याची घटना किती संवेदनशील व मानवी मनाला अत्यंत वेदनादायक अशीच बाब म्हणता येईल,तरी देखील शासन या विषयाकडे गांभीर्याने बघणार आहे की नाही?आणि बघत असेल तर आत्तापर्यंत झालेली जनआंदोलने त्यांनी मागणी केल्याप्रमाणेच येथील निकृष्ट काम करणारे ठेकेदार आणि जबाबदार अधिकारी यांच्यामुळेच रस्त्याच्या कामात झालेला भ्रष्टाचार त्याबाबतची कारवाई आजपर्यंत जनतेसमोर का आणली जात नाही?त्यामुळेच जनतेच्या मनात अंत्यत चीड निर्माण झाली आहे,याबाबत सत्य काय आहे हे सांगण्यासाठी येथील लोकप्रतिनिधी,ठेकेदार व संबंधित अधिकारी वर्ग आदिंनी या उपोषणाच्या माध्यमातून जनतेसमोर यावे अशी स्पष्ट भूमिका जनआंदोलन समितीची आहे.या विषयाच्या संबंधात शासन किती गांभीर्यपूर्वक दखल घेणार आहे,याकडे येथील जनतेचे लक्ष लागून राहिले आहे,अन्यथा या विषयाला तीव्र स्वरूपातील जनआंदोलनाची दिशा घेणे नाकारता येणार नाही.

# सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणतज्ज्ञ सुनील म्हसकर यांचा खा. बाळ्या मामांच्या हस्ते विशेष सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




**शहापूर** : रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी शहापूर येथे शहापूर तालुका आगरी समाज संचलित सामाजिक व शैक्षणिक संस्था, वाफे-शहापूर यांच्या वतीने आयोजित गुणगौरव सोहळयात सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणतज्ज्ञ आणि प्रज्ञावंत साहित्यिक सुनील म्हसकर यांचा भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळया मामा यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक, पुष्पगुच्छ व महावस्त्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री जगन्नाथ पाटील, ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प.गोविंद महाराज तरणे, समाज कल्याण न्यास अध्यक्ष सोन्या पाटील, टीडीसी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण गोंधळी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अधिकारी किशोर शेळके, उद्योजक अनिल मानिवडे, समाजसेवक नारायण अंदाडे, कमलाकर जाधव व जयराम वारघडे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी या कार्यक्रमात पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे पंडीत मसणे (दहागाव) यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच तालुक्यातील डॉ.विशाखा मिलिंद अधिकारी (शहापूर), डॉ.नम्रता बाळाराम तरणे (पाली), डॉ.नीलम प्रकाश परटोले, धाडसी रेल्वे पोलीस कर्मचारी किशोर परटोले (अंबर्जे), जान्हवी जयवंत परटोले, अभियंता प्रणय अधिकारी (सरळांबे) अशा विविध गुणवंतांचा आणि दहावी, बारावी, पदविका आणि इंजिनिअर, डॉक्टर, वकील आदी पदवी परीक्षांमध्ये विशेष नैपुण्यधारक विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी समाजात उत्तम कार्य करून आपला आदर्श समाजापुढे ठेवणाऱ्या हरिभाऊ गोतारणे (शहापूर), कृष्णा परटोले (अंबर्जे), हभप कोंडू महाराज (भातसई), रघुनाथ राव (वाफे) इत्यादी जेष्ठ नागरिकांचा उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब खारीक, सचिव काशिनाथ डोंगरे, खजिनदार प्रकाश गोंधळी, उपाध्यक्ष शाहु जाधव तसेच विश्वस्त मंडळ उपाध्यक्ष जयराम पवार, सचिव नारायण राव, सुनील गोपाळे, समिर म्हात्रे, राम खारीक आदी संस्था पदाधिकारी व सदस्य तसेच सूत्रसंचालक अरुण कराळे यांनी परिश्रम घेतले.

आशिया खंडात स्टील उत्पादनात अग्रेसर असणाऱ्या जिंदाल कंपनीच्या उद्योग विस्तारासाठी एमआयडीसी अर्थात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने शहापूर तालुक्यातील मौजे पाली हे गाव भूसंपादन करावयास घेतले आहे. हा प्रकल्प शासकीय दराप्रमाणे तीन हजार कोटी रुपयांचा आहे. मात्र, मागील २८ वर्षे सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वामी विवेकानंद संस्था, पाली या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर यांनी संविधानिक मार्गाने संस्थेच्या पदाधिकारी व ग्रामस्थांच्या मदतीने वेळीच आपल्या जीवाची पर्वा न करता तन-मन-धन अर्पण करून गेली चार वर्षे सदर अन्यायकारी भूसंपादन प्रक्रिया रोखली आहे.

सुनील म्हसकर सर हे एक शिक्षणतज्ञ असून त्यांची महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार तयार करण्यात येत असलेल्या नवीन अभ्यासक्रम विकसन समितीवर मराठी विषय तज्ञ मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात आली आहे. ते सुप्रसिद्ध व्याख्याते व प्रज्ञावंत साहित्यिक असून त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक रिसर्च पेपर, शोधनिबंध व लेख तसेच कविता विविध नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाल्या आहेत.शिक्षणतज्ज्ञ सुनील म्हसकर यांचा विशेष सन्मान झाल्याबाबत त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शहापूर यांचे कार्यालय

दुरध्वनी क्र. :- 02527-272068 फॅक्स क्र.:- 02527-272068

ई-मेल:-135shahapurst@gmail.com

### जाहीर नोटीस

**प्रती**

श्रीम. नजमा मोहम्मद शेख

रा. सोगांव ता. शहापूर जि. ठाणे.......................................**अर्जदार**

**विरुध्द**

निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग,

जन्म/मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी

नगर पंचायत, शहापूर, ग्रामपंचायत सोगांव

ता. शहापूर जि.ठाणे..................................................**सामनेवाले**

**जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, 1969 मधील कलम 13 नुसार**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणेः

1. उपरोक्त अर्जदार श्रीम. नजमा मोहम्मद शेख स्वतः जन्म दिनांक. 01/01/1976 रोजी मौजे सोगांव ता. शहापूर, जि.ठाणे, येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर नोंद निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, जन्म/मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी नगर पंचायत शहापूर व ग्रामपंचायत सोगांव यांचे दफ्तरी करुन दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना कायदेशीर कामा करीता त्यांच्या दाखल्याची आवश्यकता आहे.
2. उशीरा जन्म नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी शहापूर यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दि. 25/04/2025 रोजी दाखल केला आहे.
3. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना या कार्यालयातर्फे त्यांच्या आजी / आजोबा/ आई वडील /मुलगा / मुलगी /नातु / भाऊ / बहिण/यांचा जन्म / मृत्यु नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे 26/09/2025 रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

**सही /–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**शहापूर करीता**

**जा. क्र.महसूल/एमएजी/मृत्यू नोंद सुनावणी/एस आर–** /2025

**दिनांक :** 26/09/2025

# सेवानिवृत्त कर्मचा-यांना भिवंडी महानगरपालिकेचा निरोप


दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानाप्रमाणे ०४ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा. प्र. से) यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देणेत आला. याप्रसंगी



सहाय्यक आयुक्त (आरोग्य) श्री. शैलेश दोंदे यांच्या शुभहस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यांत आला आणि त्यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छाही दिल्या.

महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या तिस-या मजल्यावरी मा.आयुक्त यांचे सभागृहात संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमातून ) अश्विनी अनिल पांडव (लिपीक, टेलिफोन ऑपरेटर) दुरध्वनी विभाग, सेवानिवृत्त.२) संतोष कृष्णा भोईर (लिपीक) प्र.स.क्र.१, सेवानिवृत्त.३) विजय पुडंलिक पवार (इले. हेल्पर) विद्युत विभाग, सेवानिवृत्त.४) प्रल्हाद सिताराम भगत (सॅ.कामगार) प्रभाग समिती क्र.१ सेवानिवृत्त.अशा ०४ सेवानिवृत्त मनपा कर्मचा-यांना महानगरपालिकेच्यावतीने आज निरोप देण्यांत आला. या प्रसंगी अतिरिक्त शहर अभियंता सचिन नाईक व मनपा अधिकारी / कर्मचारी, सर्व कर्मचारी संघटना प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य इ. उपस्थित होते.









**मेष**

तुमची काही कामे थांबलेली होती ती पूर्ण होतील. धार्मिक प्रवासाचा योजना आखणार आहात पण काही कारणामुळे ही यात्रा पुढे ढकलावी लागेल.

**वृषभ**

आर्थिक स्थिती ठिक असली तरी पैसे जपून वापरा आणि बचत करण्याचा प्रयत्न करा.व्यवसायात तुमची प्रगती असून कर्मचाऱ्यांकडे लक्ष ठेवा.

**मिथुन**

ऑफिसमध्ये तुम्हाला जे काही बोलायचे आहे ते स्पष्ट बोला, त्यामुळे समस्या कमी होतील. संध्याकाळी कुटुंबासोबत मंगलकार्यात सहभागी होणार आहात.

**कर्क**

तुम्ही स्वतःसाठी वेळ काढणार असून काही खरेदी देखील करणार आहेत. जे लोक व्यवसायात आहेत त्यांच्यासाठी बिझनेस ट्रिप महत्त्वाची असेल.

**सिंह**

मंगलकार्यासाठी तुम्ही खर्च करणार आहात. तुमची सरकारी कामे काही कारणामुळे रखडलेली होती ती आता सुरळीतपणे मार्गी लागणार आहेत. करिअर

**कन्या**

तुम्ही स्वतः कामात फोकस ठेवा यामुळे कामे वेळेत मार्गी लागतील. अनेक दिवसांपासून सुरू असलेला ताण आज काहीसा कमी होईल.

**तूळ**

प्रियजनांच्या भेटीमुळे ताणतणाव कमी होईल. अपेक्षित धनलाभ झाल्याने मनोबल वाढेल. तुम्ही करिअरसाठी उपयोगी पडेल असे शिक्षण घ्या.

**वृश्चिक**

तुमच्या कामातील निष्काळजीपणा मोठं नुकसान करु शकतो. काम करताना सतर्क राहा. निरर्थक वाद तुमच्यासाठी अडचणी निर्माण करु शकतात .

**धनु**

तसेच व्यवसायात चांगल्या संधी तुमच्या आसपास आहेत त्याचा लाभ घ्या.जोखीम असणारे काम घेवू नका. उधारी मागेल तर देवू नका.

**मकर**

घरासंदर्भातील मालमत्तेचा काही वाद कोर्ट-कचेरीमध्ये सुरु असेल तर त्यामध्ये निकाल तुमच्या बाजूने असेल.करिअरमध्ये प्रगती आहे.

**कुंभ**

घरी वातावरण समाधानी असून सगळेजण तुम्हाला कामात मदत करण्यासाठी तयार राहतील. रखडलेली महत्त्वाची कामे मार्गी लागतील.

**मीन**

भांडणापासून दूर राहा. खूप धावपळ झाल्यामुळे तब्येतीवर परिणाम होवू शकतो तुम्ही आहार आणि आरामाकडे लक्ष द्या.



# रक्तरंजित गरब्याने डोंबिवली हादरली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेला ठाकुरवाडी भागातील बेडेकर गल्लीमध्ये दांडिया खेळत असलेल्या एका तरूणावर चार जणांनी अचानक चॉपर, लोखंडी सळईन हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. रविवारी रात्री साडे दहा वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली असून यात कुणाल विजय कुशाळकर (वय 19) हा तरुण जखमी झाला आहे. याप्रकरणी विष्णूनगर पोलीस ठाण्यात चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डोंबिवली पश्चिमेला कोपर रस्त्यावरील शिवशक्ती चाळ भागात राहतो. त्याचे वडील रिक्षा चालक आहेत. कुणालच्या तक्रारीवरून पोलिसांनी दिपेश टेकाळे, भैय्या काऊतर, अभय खाडे आणि अन्य एक अशा चार जणांच्या विरूद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलमाने गुन्हा दाखल केला आहे. कुणाल हा घरपोच वस्तू विक्री व्यवसायात एका खासगी कंपनीत वितरण कर्मचारी म्हणून काम करतो.

कुणाल याने दिलेल्या तक्रारीनुसार, मी व माझे मित्र सनी राठोड, रोहित मोखळे, चंदन सरदार रविवारी रात्री साडे दहा वाजण्याच्या दरम्यान डोंबिवली पश्चिमेतील ठाकुरवाडी मधील बेडेकर गल्लीतील गरबा कार्यक्रमात दांडिया खेळत होतो. मी दांडियात खेळत असताना बाजुच्या भागात मोठ्याने ओरडण्याचा आवाज येत होता. त्या भागातील लोक भांडण करत बेडेकर गल्लीतील गरब्याच्या ठिकाणी एकमेकांशी भांडत आले. त्यांच्यात जोरदार रेटारेटी सुरू होती. यावेळी माझे मित्र सनी राठोड, चंदन सरदार आणि रोहित गरब्याच्या बाजूला रस्त्यावर उभे होते. तिकडून भांडण करत आलेल्या तरूणांनी अचानक सनी, चंदन आणि रोहित यांना मारहाण सुरू केली. मित्रांना सोडवण्यासाठी मी मध्ये पडलो. त्यावेळी दीपेश, भैय्या आणि अभय यांनी आपण पाठमोरे उभे असताना आपल्यावर पाठी मागून चॉपरने हल्ला केला. तर अन्य एकाने लोखंडी सळईने मला मारहाण केली. त्याचवेळी आपल्या बाजूला असलेल्या रोहित याच्या पाठीवर आणि पायावर या तिघांनी चॉपरने हल्ला करून त्यालाही जखमी केले. जखमी तरुणांवर पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात उपचार करण्यात आले.

डोंबिवली पश्चिमेला दांडिया उत्सव सुरु असताना ही घटना घडली आहे. याप्रकरणी चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील दोन जण हे अल्पवयीन असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम चोपडे यांनी दिली.

# पालघर जिल्ह्यातील 48 विशेष शिक्षक कायम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर, ता. १ :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जिल्ह्यातील कंत्राटी विशेष शिक्षकांना कायमस्वरूपी पदावर नियुक्ती देण्यात आली. त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या हस्ते मंगळवारी (ता. ३०) एकूण ४८ विशेष शिक्षकांना कायमस्वरूपी नियुक्तीचे आदेश दिले. यात पालघरमधील ४०, बृहन्मुंबई पालिकेअंतर्गत सात व विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे कार्यालयअंतर्गत एक असे शिक्षक समाविष्ट आहेत.

२००४ पासून समग्र शिक्षा अभियानांतर्गत विशेष विद्यार्थ्यांसाठी समावेशित शिक्षण उपक्रम राबविला जात आहे. या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, वैद्यकीय व सामाजिक गरजांची पूर्तता व्हावी म्हणून कंत्राटी तत्त्वावर विशेष शिक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. सुरुवातीला मानधन तत्त्वावर कार्यरत असलेले हे शिक्षक आता कायमस्वरूपी पदावर कार्यरत राहणार आहेत.

जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील १५० केंद्रशाळांपैकी ४८ विशेष शिक्षकांचे समायोजन करण्यात आले आहे. यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार असून, समावेशित शिक्षण उपक्रमाला नवी उभारी मिळाली आहे.

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी समावेशित शिक्षण उपक्रम महत्त्वाचा आहे. विशेष शिक्षकांची कायमस्वरूपी नेमणूक ही या उपक्रमाला नवे बळ देणारी ठरेल. यामुळे जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम व सर्वसमावेशक होईल, असा मनोज रानडे यांनी व्यक्त केला.

# ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो गाड्यांच्या खरेदीचा मार्ग मोकळा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली -** ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो-५ मार्गिकेसाठी मेट्रो गाड्यांच्या खरेदीचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) नुकत्याच झालेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीत या मार्गिकेकरिता २२ गाड्यांच्या खरेदीसाठी 'टिटागढ रेल सिस्टिम्स' यांना २,४८१ कोटी रुपयांना कंत्राट देण्यास मान्यता दिली आहे.

मेट्रो ५ मार्गिका २४.४५ किमी लांबीची असून, त्यावर १७ स्थानके नियोजित आहेत. या मार्गिकेसाठी आठ हजार ४१६ कोटी रुपयांचा खर्च येणार असून, ही मार्गिका दोन टप्प्यांत सुरू करण्याचे 'एमएमआरडीए'चे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यात कापूरबावडी ते धामणकर नाका असा १२.२० किमी लांबीचा मार्ग सुरू केला जात आहे. या टप्प्यात सात स्थानके आहेत. सध्या या टप्प्यातील मार्गिकेचे ९६ टक्के स्थापत्य काम पूर्ण झाले आहे. तर, धामणकर नाका ते कल्याण एपीएमसी असा १२.३२ किमीचा दुसरा टप्पा असून या कामास लवकरच प्रारंभ होणार आहे.


## उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर

### -: जाहिर आवाहन :-

०१. शहरातील सर्व नागरीकांच्या निदर्शनास आणण्यात येते की, नागरी क्षेत्रात अनधिकृत इमारती बांधकामाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे दिसते. विकासकाकडून नियमोचित परवानग्या प्राप्त न करताच बांधकाम करण्यात येते व तद्नंतर अशा सदनिका, मालमत्ता विक्री करण्यात येतात अशा व्यवहाराची नोंदणी संबंधित दुय्यम निबंधक यांचेकडे करण्यात येते. परंतु, जेंव्हा उक्त बांधकाम अनधिकृत असल्याचे लक्षात येते, तेव्हा नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/नियोजन प्राधिकरणाकडून निष्कासनाची कार्यवाही करण्यात आल्यास निष्पाप गाळेधारक किंवा सदनिकाधारक यांना निष्कासनाच्या कार्यवाहीला सामोरे जावे लागते. वास्तविक बहुतांश गाळेधारक व सदनिकाधारकांना ते राहत असलेली इमारत अनधिकृत असल्याची माहिती नसते. यामुळे गाळेधारक व सदनिकाधारकांची फसवणूक होण्याचे प्रकार निदर्शनास येत आहेत.

०२. त्या अनुषंगाने शहरातील सर्व नागरीकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, उल्हासनगर शहरातील अनधिकृत इमारतींमधील सदनिका/गाळे खरेदी, विक्री व्यवहार नोंदणी करु नये. इमारतीमध्ये सदनिका, गाळे खरेदी करण्यापूर्वी ती अधिकृत असलेबद्दलची माहिती महापालिकेच्या नगररचना विभागात संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी, जेणेकरुन फसवणुकीपासून वाचता येईल. अनधिकृत इमारतीवर निष्कासनाची कार्यवाही झाल्यानंतर होणा-या नुकसानास महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

जावक क्रमांक :
उमपा/पीआरओ/३१६/२०२५
दिनांक : ०१/१०/२०२५

सही/-
(डॉ. धीरज धीरज चव्हाण)
अतिरिक्त आयुक्त (२)
उल्हासनगर महानगरपालिका


# आव्हानांवर मात करूया, आपत्तीग्रस्त बांधवांना नव्या उमेदीने उभे करुया

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई, दि. १: -** विजयादशमीच्या सणाकडून प्रेरणा घेऊन आव्हानांवर, संकटावर मात करण्याची हिंमत बाळगुया, असे आवाहन करतानाच, विजयादशमीचे हे पर्व राज्यातील नागरिकांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि भरभराट घेऊन येवो, अशी प्रार्थना मुख्यमंत्री श्री. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्याही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

विजयादशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिन यांच्या पुर्वसंध्येला मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शुभेच्छा देतानाच, राज्यात पावसामुळे अनेक भागात अभूतपुर्व बिकट परिस्थिती उद्भवली आहे. या संकटसमयी आपण सगळे एकजुटीने या आपत्तीग्रस्त नागरिकांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहूया. शेतकरी, कष्टकऱ्यांच्या मदतीसाठी सर्वतोपरी योगदान देऊया. या बांधवांना पुन्हा नव्याने उमेदीने करण्याचा निर्धार करूया, असे आवाहन केले आहे.

'विजयादशमीचा सण हा असत्यावर सत्याचा विजयाचा संदेश घेऊन येतो. या सणाकडून सकारात्मक अशी ऊर्जा घेऊया. बिकट परिस्थितीवर मात करून, अडचणीतून मार्ग काढण्यात महाराष्ट्र नेहमीच पुढे राहीला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून ते अनेक अग्रणींनी आपल्याला हाच वारसा-वसा दिला आहे. ही प्रेरणा घेऊन महाराष्ट्राच्या विकासात योगदान देण्यासाठी सज्ज होऊया. आपल्या सर्वांच्या एकजूटीतून महाराष्ट्र विकासाची पताका डौलाने फडकत ठेवण्यासाठी निर्धार करूया, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी संदेशात म्हटले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मचक्र प्रवर्तनातून विश्वाला सामाजिक समतेची दिशा दिली. हा दिवस अखंड विश्वासाठी चिरंतन प्रेरणादायी ठरो, अशी मनोकामनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस व्यक्त केली आहे.

# पुणे जिल्हा परिषदेच्या जालिंदरनगर प्राथमिक शाळेला पुरस्कार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

पुणे जिल्हा परिषदेच्या जालिंदरनगर प्राथमिक शाळेला World's Best School Prizes - Community Choice Award या पुरस्काराने T4 Education या जागतिक शैक्षणिक संस्थेने सन्मानित केले आहे हे पुणे जिल्हा परिषदेसाठी अत्यंत अभिमानास्पद व कौतुकास्पद बाब आहे. सदरचा पुरस्कार हा शाळेच्या नवकल्पना, सामाजिक प्रभाव आणि विद्यार्थी विकासासाठी दिला जातो. जगातील सर्वोत्कृष्ट प्रतिष्ठित पुरस्कार मिळविणे म्हणजेच शिक्षक आणि विद्यार्थी हे यशाचे दोन प्रमुख आधारस्तंभ असलेले. त्यांच्या गुणवत्तेमुळे शाळेचा व पुणे जिल्ह्याचा नावलौकिक केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतीय उपखंडातही विस्तारला आहे हे एक उत्तम उदाहरण आहे. विद्यार्थ्यांचा ज्ञान, गुणवत्ता आणि सामाजिक योगदान यातून विद्यार्थ्यांचा दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल आणि त्याची फळं विद्यार्थ्यांना मिळतील. मिळालेला पुरस्कार ही केवळ कागदोपत्री बाब नसून शिक्षणपद्धती, प्रेरणादायक मार्गदर्शन, सोयी-सुविधा आणि नैतिक मूल्यांमुळे विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास यामुळे विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास, नेतृत्वक्षमता आणि जवळची भावनात्मक नाती निर्माण होतात आणि विद्यार्थ्य विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करतात तेव्हा शाळेची प्रतिष्ठा आपोआप वाढते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळालेले पुरस्कार, स्पर्धेमधील विषय आणि समाजसेवेतील योगदान यामुळे शाळेचे नाव जगभरात गाजते. एकंतेता त्याचाच प्रत्यय जिल्हा परिषदच्या जालिंद्रनगर प्राथमिक शाळेने केला आहे. यामध्ये विविध वयोगटातील विद्यार्थी एकमेकांना शिकवतात व शिकतात असा सहअध्ययन मॉड्यूल्स शाळेच्या शैक्षणिक क्रांतिकारी बदल झाला आहे. अशा शाळे जगभरातील विद्यार्थ्यां व पालकांना प्रेरणास्थान ठरतात. यामुळे शाळेचा नावलौकिक दीर्घकाल टिकून राहतो आणि तो एक आदर्श शैक्षणिक संस्था म्हणून मान्यतेस साऱ्यात अढळलेला जातो. याचे सातत्य टिकवण्यासाठी व अशाच इतरही संस्था निर्माण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यात सहभाग असलेल्या शिक्षकांना, विद्यार्थ्यां, पालकांना मनापासून धन्यवाद देतो! अशी माहिती मा.श्री.गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी दिली.

# वसई विरार मनपाच्या नामफलकांची दुरावस्था

## नामफलकांवरील रुपयांचा खर्च वाया




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वसई:** वसई विरार शहरातील रस्ते, चौक, गल्ली यांची ओळख पटावी म्हणून महापालिकेकडून लावण्यात आलेल्या नामफलकांची दुरावस्था झाली आहे. अनेक ठिकाणचे नामफलक गायब झाले असून जे नामफलक शिल्लक आहे ते ही तुटलेल्या अवस्थेत आढळून येत आहेत.

वसई विरार शहरात नागरिकांना अचूक ओळख पटावी यासाठी २०२२ साली विविध ठिकाणी नामफलक लावण्यात आले होते. हिरव्या किंवा निळ्या रंगाच्या नामफलकावर पांढऱ्या रंगाच्या अक्षरात संबंधित रस्त्याचे, चौकाचे अथवा परिसराचे नाव स्पष्टपणे लिहिलेले असते. महाराष्ट्रातील नियमांनुसार नामफलकांवर प्रथम मराठी भाषेत आणि त्यानंतर इंग्रजी भाषेत ठिकाणाचे नाव लिहिले जाते. नामफलकांमुळे प्रवाशांना योग्य दिशा शोधणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका, पोलीस, अग्निशमन दलाला घटनास्थळी पोहोचणे सुलभ होते. शहरातील भौगोलिक व्यवस्था नीट ठेवण्यास, नोंदी करण्यास आणि प्रशासन कामकाजातही हे फलक महत्त्वाची भूमिका बजावतात.

नामफलक नसल्याने नागरिकांची गैरसोय शहरातील महत्त्वाचे चौक आणि रस्त्यांवरील नामफलकांची दुरावस्था झाल्याने नागरिकांसह बाहेरून येणाऱ्या प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. नामफलकांअभावी शहरातील प्रवासी, पर्यटक, टपाल वितरक यांना योग्य मार्ग शोधणे कठीण होऊन बसते. तर आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका, पोलीस व अग्निशमन दलाला घटनास्थळी पोहोचण्यास विलंब होतो.

शहरात ज्या ज्या भागात नामफलक खराब झाले असतील तुटले असतील त्याठिकाणी नव्याने फलक लावले जातील असे पालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगण्यात आले आहे.

लाखोंचा खर्च वाया २०२२ साली शहरात नामफलक बसवण्यात आले होते. शहरातील ९ प्रभागांचे सर्वेक्षण करून प्रत्येक गल्ली, चौक आणि रस्त्यांवर नामफलक लावण्यात आले. मात्र, सद्यस्थितीत यातले बहुतांश फलक गायब झाले असून उरलेले नामफलकही तुटलेल्या अवस्थेत आढळून येत असल्यामुळे नामफलकांवर करण्यात आलेला लाखो रुपयांचा खर्च वाया गेला असल्याची तक्रार नागरिक करत आहेत.

# केडीएमसीच्या मलनिस्सारण केंद्राला 90 विद्यार्थ्यांची भेट


**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण केडीएमसीच्या वाडेघरजवळील मलनिस्सारण केंद्रास मुथा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भौगोलिक क्षेत्रभेट दिली. यावेळी कल्याण शहरातून येणारे मलयुक्त सांडपाणी प्रक्रिया करून कसे शुद्ध केले जाते, याची सर्व प्रकारची माहिती केंद्राचे प्रमुख राकेशकुमार सिंग, लॅब टेक्निशियन चौधरी आणि सुपरवायझर अजय जैस्वाल यांनी विद्यार्थ्यांना दिली. या भेटीत ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या संपूर्ण केंद्रातून दर तीन तासाला २ एमएलडी एवढे पाणी शुद्ध केले जाते. त्याचबरोबर दर दिवसाला १८ एमएलडी पाणी शुद्ध होते. हे शुद्ध झालेले पाणी स्थानिक बगीचा तसेच रोपवाटिकांना वापरले जाते. उर्वरित पाणी नदीत सोडले जात असल्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी माहिती समजावून घेत विचारलेल्या प्रश्नांचे समाधानकारक निरसन करण्यात आले.

# कचरा अपघटन प्रक्रियेमुळे नवी मुंबईचा जीव गुदमरतोय !

## प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारभारावर नागरिकांचा संताप



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई :** नवी मुंबई शहरावर गेल्या काही दिवसांपासून वायू प्रदूषणाचे दाट सावट पसरले असून, यामुळे नागरिकांना विविध आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः लहान मुले, वयोवृद्ध आणि श्वसनाचे आजार असलेल्या संवेदनशील व्यक्तींसाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक बनली आहे. या प्रदूषणाचे मुख्य कारण मुंबईतील मानखुर्द येथील कचराभूमीमध्ये लागणारी आग आणि वाशी जवळील औद्योगिक वसाहतींमधून बाहेर पडणारा रासायनिक धूर असल्याचे समोर आले आहे.

मुंबईतील मानखुर्द येथील कचराभूमीत कचऱ्याच्या अपघटन प्रक्रियेतून तयार होणाऱ्या मिथेन वायूमुळे अनेकदा आग लागते. वाऱ्याच्या दिशेने या आगीतून निर्माण होणारा धूर वाशी, कोपरखैरणे आणि आसपासच्या परिसरात पसरतो, ज्यामुळे हवेची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात खालावते. सध्या शहरातील वातावरणाला हीच परिस्थिती कारणीभूत असावी असा अंदाज नवी मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाने वर्तवला आहे. याशिवाय, वाशी जवळील औद्योगिक वसाहतींमधून रसायनयुक्त सांडपाणी आणि धुरावाटे बाहेर पडणारे रासायनिक वायू या प्रदूषणात भर घालत आहेत. त्यामुळे नागरिकांना डोळ्यांची जळजळ, घसा खवखवणे आणि खोकल्यासारख्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाने केले आहे.

ही समस्या अतिशय गंभीर असली तरी प्रशासनाकडून मात्र यावर कोणत्याही ठोस उपाययोजना केल्याचे आढळून येत नाही. नवी मुंबई महापालिकेने मानखुर्द कचराभूमीच्या समस्येबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेशी वारंवार पत्रव्यवहार केला असल्याचे सांगितले आहे. दुसरीकडे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून औद्योगिक प्रदूषणाबाबत ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत. प्रदूषण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी याला हवामानातील 'धुकं' असे संबोधले आहे, परंतु हवेतील उग्र दर्प आणि श्वसनाचे त्रास वेगळीच परिस्थिती दर्शवत आहेत.

# शहापूर : सापगाव पुलावर जड वाहनांना बंदी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**शहापूर :** रविवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे शहापूरजवळ असलेल्या सापगाव येथील भातसा नदीवरील पुलाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. त्यामुळे या पुलावरून अवजड वाहनांना वाहतूक करण्यास बंदी घालण्याचा निर्णय पोलीस प्रशासनाने घेतला आहे.

सापगाव पुलाच्या डागडुजीचे काम हाती घेण्यात आले असले, तरी सद्यस्थितीत या मार्गावरून केवळ दुचाकी आणि चारचाकी वाहनांना परवानगी देण्यात आली आहे. मुसळधार पावसामुळे पुलाच्या दोन्ही बाजूकडील कठडे तुटले आहेत. रुंदीने आधीच कमी असलेल्या या पुलावरून अवजड वाहनांना वाहतुकीसाठी मज्जाव करण्यात आला आहे. गेल्या दोन दिवसांपासून शहापूरमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस असल्यामुळे तसेच पुलाची दयनीय अवस्था झाल्यामुळे आगारातून एकही बस सापगाव पुलावरून सोडली जात नसल्याची माहिती आगार प्रमुख मानसी शेळके यांनी दिली होती. मात्र, आजपासून बसेस पुन्हा सुरू करण्यात आल्या आहेत.

### नवीन पुलाची मागणी

भातसा नदीवरील हा पूल फार जुना आणि कमकुवत झाला आहे. अनेक वर्षांपासून नवीन पूल बांधण्याची मागणी होत असतानाही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर, आता तातडीने नवीन पूल बांधण्याची नितांत गरज असल्याची मागणी नागरिकांनी केली आहे. या अत्यावश्यक मागणीकडे प्रशासन आणि राजकीय पुढारी गांभीर्याने लक्ष देतील का, असा सवाल उपस्थित होत आहे.

# खाजगीकरणाविरोधात वीज कर्मचाऱ्यांची बेमुदत संपाची हाक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** वीज कर्मचारी, अभियंता, अधिकारी कृती समितीच्या वतीने खाजगीकरणाविरोधात तसेच कंपनीच्या पुनर्रचना विरोधात सुरू केलेल्या आंदोलनाचा महत्त्वाचा टप्पा आज पार पडला. कल्याण तेजश्री बिल्डिंग समोर सर्व कर्मचारी अभियंते अधिकारी यांनी द्वार सभेस हजेरी लावून प्रचंड घोषणाबाजी तसेच शासनाच्या विरोधात निषेध व्यक्त करून 9,10,,11 तारखेच्या बेमुदत संपाची हाक दिली.

याद्वारे वर्कर्स फेडरेशनचे उपसरचिटणीस अरुण मस्के, सबर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशनचे श्रीनिवास बोबडे, इंटक संघटनेचे सुनील चौधरी, इंटक फेडरेशनचे इंदल राठोड, कामगार महासंघाचे सचिन कदम, मागासवर्गीय संघटनेचे पदाधिकारी राम ढेपे यांनी मार्गदर्शन केले. प्रचंड घोषणाबाजी तसेच निदर्शने यावेळी करण्यात आली. या द्वार सभेचे सूत्रसंचालन वर्कस फेडरेशनचे संयुक्त सचिव औदुंबर कोकरे यांनी केले.



# गुणवंतांचा गुणगौरव व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण :** शहापूर तालुका आगरी समाज संचलित सामाजिक व शैक्षणिक संस्था, गंगा देवस्थान, वाफे-शहापूर यांच्या वतीने तालुक्यातील गुणवंतांचा गुणगौरव व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ पार पडला. यामध्ये शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वामी विवेकानंद संस्था,पाली या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा शिक्षणतज्ज्ञ व प्रतिभावंत साहित्यिक सुनील म्हसकर यांचा आणि पत्रकारिता क्षेत्रातील कामगीरी बद्दल पंडीत मसणे यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच तालुक्यातील डॉ. विशाखा अधिकारी, डॉ.नम्रता तरणे, रेल्वे पोलिस कर्मचारी किशोर परटोले, प्रतिभावंत विद्यार्थी प्रणय अधिकारी यासह अशा विविध गुणवंतांचा आणि दहावी, बारावी, पदवी, इंजिनिअर, डॉक्टर, वकील आदी परीक्षांमध्ये विशेष नैपुण्यधारक विद्यार्थ्यांचा तर समाजात उत्तम कार्य करून आपला आदर्श समाजापुढे ठेवणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला. तसेच उच्च व कौशल्यपूर्ण असे उत्तम शिक्षण घेऊन केवळ नोकरीच्याच पाठीमागे न लागता व्यवसायाभिमुख व्हावे, आपल्याला व्यवसायासाठी जी मदत व मार्गदर्शन लागेल मी माझ्या माध्यमातून देण्याचा निश्चित प्रयत्न करेन तर या आगरी समाज सभागृह विस्तारीकरण व सुशोभीकरणासाठी 39 लाख रुपयांचा खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत निधी मंजूर करण्यात आले असल्याचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी म्हटले.या कार्यक्रमप्रसंगी माजी मंत्री जगन्नाथ पाटील, लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा), समाज कल्याण न्यासचे अध्यक्ष सोन्या पाटील, आगरी सेना ठाणे जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) नारायण अंदाडे, शिवसेना (उबाठा) तालुका सहसंपर्कप्रमुख कमलाकर जाधव, उद्योजक अनिल मानिवडे, टीडीसी बँक माजी मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण गोंधळी, ज्येष्ठ किर्तनकार ह.भ.प.गोविंद महाराज तरणे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे अधिकारी किशोर शेळके, जयराम वारघडे आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अरुण कराळे यांनी केले तर यासाठी संस्थेचे कार्यकारी मंडळ अध्यक्ष बाळासाहेब खारीक, सचिव काशिनाथ डोंगरे, खजिनदार प्रकाश गोंधळी, उपाध्यक्ष शाहु जाधव, विश्वस्त मंडळ उपाध्यक्ष जयराम पवार, सचिव नारायण राव, सुनील गोपाळे, समिर म्हात्रे, राम खारीक आदी संस्था पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले होते.

# 'राज्यात सर्वाधिक विकास होत असलेले शहर हा ठाण्याचा लौकिक' - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे प्रतिपादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्याची झपाट्याने वाढ होत आहे. गेल्या पंचवीस वर्षात ठाण्यात आमूलाग्र बदल झाला असून आता राज्यातील सर्वाधिक विकसित होत असलेले शहर असा लौकिक ठाण्यास मिळाला आहे, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गडकरी रंगायतन येथे ठाणे महापालिकेच्या ४३ वा वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

ठाणे महापालिकेच्या ४३व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने, यावर्षीच्या गणेशोत्सव आरास स्पर्धेचे पारितोषिक वितरण आणि कर्मचाऱ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी गडकरी रंगायतन येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमास, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, उपायुक्त मीनल पालांडे, एसआरएचे राजकुमार पवार उपस्थित होते.

ठाण्याच्या विकासाचा धर्मवीर आनंद दिघे यांचा विचार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही पुढे कायम ठेवला आहे. त्यातूनच महापालिकेने नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविले. ठाण्याचा कायापालट झाला आहे, असेही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले.

तर, गणेशोत्सव आरास स्पर्धा ही धर्मवीर आनंद दिघे यांनी संकल्पना. गणेशोत्सवात कलाकार आणि कार्यकर्ते घडतात. त्यामुळे त्यास प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा सुरू करण्यात आली. यंदा या स्पर्धेच्या बक्षिसाच्या रकमेतही वाढ करण्यात आली आहे, असे खासदार नरेश म्हस्के म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात ठाण्याच्या विकासाला दिशा मिळाली आहे. ठाणे शहर बदलतंय आणि त्यात महापालिका अधिकारी व कर्मचारी यांचाही वाटा असल्याचेही खासदार म्हस्के यांनी स्पष्ट केले.

आजचा दिवस अत्यंत आनंदाचा आणि उत्साहाचा आहे. वर्षभरात जे केले त्याची उजळणी आणि पुढे जे काम करायचे त्यासाठी वचनबद्ध होण्याचा हा दिवस असल्याचे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी प्रास्ताविकात केले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते ठाणे महापालिकेतर्फे दरवर्षीप्रमाणे घेण्यात आलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आरास स्पर्धा २०२५ चे पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच, या स्पर्धेचे परीक्षण करणारे ज्येष्ठ चित्रकार सदाशिव कुलकर्णी व किशोर नादावडेकर आणि ठाणे वैभवचे ज्येष्ठ पत्रकार आनंद कांबळे यांचाही सत्कार करण्यात आला.




पारितोषिक वितरण समारंभानंतर, ठाणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी विविध कलाविष्कार सादर केले. त्याचे सूत्रसंचालन, आयुक्त कार्यालयातील स्वीय सहाय्यक सुनीता पारखी, उप माहिती व जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर आणि राजेंद्र पाटणकर यांनी केले.

### 'स्वच्छतोत्सवा'ची सांगता

स्वच्छताही सेवा या पंधरवड्याअंतर्गत सुरू असलेल्या 'स्वच्छतोत्सवा'ची सांगताही वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात करण्यात आली. सफाई कर्मचाऱ्यांनी विविध कार्यक्रमात भाग घेतला. तसेच, स्वच्छतेविषयी जागृती करणारे पथनाट्यही सादर करण्यात आले.

### आरास स्पर्धेतील विजेते

या आरास स्पर्धेमध्ये उत्कृष्ट सजावटीसाठीचा प्रथम क्रमांक (पारितोषिक - रुपये २५ हजार) शिवसम्राट मित्र मंडळ, गांधीनगर यांना मिळाला. तर, दुसरा क्रमांक (रुपये २० हजार) - गुणसागर नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कळवा यांना, तिसरा क्रमांक (रुपये १५ हजार) - कोलबाड मित्र मंडळ, कोलबाड यांना तर, उत्तेजनार्थ पारितोषिक (रुपये १० हजार) - गोपाळ गणेश मित्र मंडळ - आझाद नगर यांना मिळाले.

उत्कृष्ट मूर्तीकारासाठीच्या स्पर्धेत, प्रथम क्रमांक (रुपये १० हजार) - राकेश घोष्टीकर - श्रीरंग सहनिवास गणेशोत्सव मंडळ यांना, द्वितीय क्रमांक (रुपये ७ हजार) - मदन नागोठणेकर- सार्वजनिक उत्सव मंडळ यांना तर, तृतीय क्रमांक (रुपये ५ हजार) - मिलिंद सुतार - जय भवानी मित्र मंडळ यांना मिळाला.

स्वच्छतेच्या स्पर्धेत, प्रथम क्रमांक (रुपये १० हजार) - काजूवाडी वैती नगर रहिवासी मंडळ, काजूवाडी यांना, द्वितीय क्रमांक (रुपये ७ हजार) - शिवगर्जना मित्र मंडळ, उथळसर यांना आणि तृतीय क्रमांक (रुपये ५ हजार) - स्वातंत्र्यवीर सावरकर मित्र मंडळ, सावरकर नगर यांना मिळाला.

# अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त केडीएमसीमार्फत प्रा. प्रवीण दवणे यांचे व्याख्यान




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** अभिजात मराठी भाषा दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताहाचे औचित्य साधून दिनांक 3 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता महापालिकेच्या कल्याण पश्चिम येथील आचार्य प्र.के. अत्रे रंगमंदिरात "मराठी भाषेतील अभिजात सौंदर्य" या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक आणि कवी प्राचार्य प्रवीण दवणे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

कला रसिकांनी, मराठी भाषा प्रेमींनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन महापालिका सचिव तथा मराठी भाषा अधिकारी किशोर शेळके यांनी केले आहे.

# स्वच्छतेच्या संस्कारातून स्वच्छतेची चळवळ - आ. संजय केळकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दशकभरापूर्वी स्वच्छतेचा संस्कार रुजावा यासाठी केलेल्या हाती घेतलेल्या स्वच्छता अभियानामुळे देशभरात स्वच्छतेची चळवळ उभी रहात आहे. समूहाने एकत्र येऊन स्वच्छता करणे आणि ती टिकवणे हा या चळवळीचा मूलमंत्र आहे, असे प्रतिपादन आमदार संजय केळकर यांनी केले. ठाणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे ठाणे रेल्वे स्टेशन परिसरात आयोजित करण्यात आलेल्या सर्वंकष स्वच्छता मोहिमेत आमदार संजय केळकर सहभागी झाले होते.



स्वच्छताही सेवा या पंधरवड्याची सांगता ०२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने होत आहे. या पंधरवड्यात ठाणे महापालिकेतर्फे विविध भागात 'स्वच्छतोत्सवा'चे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी सकाळी ठाणे रेल्वे स्टेशन परिसर आणि येऊर गाव येथे सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या अभियानात स्वयंसेवी संघटनांसह, शालेय विद्यार्थीही सहभागी झाले.

आमदार संजय केळकर, माजी नगरसेवक संजय वाघुले, उपायुक्त मनीष जोशी, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी, नागरिक या सफाई मोहिमेत सहभागी झाले. सार्वजनिक स्वच्छता, कचऱ्याचे वर्गीकरण याची महती सांगणारे पथनाट्यही यावेळी सादर करण्यात आले.

### येऊरमध्येही स्वच्छतोत्सव

स्वच्छता ही सेवा आणि वन्य जीव सप्ताह यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे महानगरपालिका आणि येऊन वन परिक्षेत्र विभाग यांनी येऊर गावात स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले होते. या मोहिमेत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, वन विभागाचे अधिकारी सहभागी झाले.

### स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबीर

स्वच्छताही सेवा या उपक्रमात सफाई मित्रांसाठी आरोग्य शिबिरांचेही आयोजन करण्यात येत आहे. त्यात, बुधवारी, सफाई कर्मचाऱ्यांसाठी हेपिटायटीस बी लसीकरण मोहिमेचा आरंभ वर्तरनगर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात करण्यात आला. गुरूकृपा फाऊंडेशनच्या मदतीने ही लसीकरण मोहिम राबवण्यात येत आहे. ही मोहिम वर्षभर चालणार असून सर्व सफाई कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. इथेच मॅमोग्राफी शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.




# भिवंडीत अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या दोन गुन्हेगारांना अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरातील नाशिक रोडवरील मिल्लत नगर या भागात बनावट नोटा बदली करण्यासाठी (पिस्टल) अग्निशस्त्रासह येणार असल्याची माहिती भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांना मिळताच त्यांनी आपल्या विशेष पोलीस पथकासह घटनास्थळी सापळा रचून दोघांना ताब्यात घेऊन अटक केली आहे.त्यांच्या कडून 500 रूपये दराच्या 48 नोटांचे बंडल,पिस्टल शस्त्र आणि इको स्पोर्ट कार असा एकुण सहा लाख 33 हजार 450 रूपये किमंती मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दसरा व नवरात्र उत्सवा सारखा धार्मिक सण साजरा होत असल्याने ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडी पोलीस उपआयुक्त कार्यक्षेत्रात विशेष पोलीस बंदोबस्त व गस्त घालण्याचे काम पोलीस दलाच्यावतीने सुरू असुन भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांना माहिती मिळाली कि भिवंडीतील नाशिक महामार्गावरील मिल्लत नगर येथे काही इसम प्राणघातक शस्त्रासह बनावट नोटा बदली करण्यासाठी येणार आहेत त्यामुळे त्यांनी पोलीस उपआयुक्त अमरसिंह जाधव,एसीपी शेखर बगाडे यांना माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सपोनि श्रीराज माळी, मिथुन भोईर, पोउनि रविंद्र पाटील, रामचंद्र जाधव, सुधाकर चौधरी, सुनिल साळुंके, पोहवा निलेश बोरसे, प्रशांत राणे, प्रकाश पाटील, सुदेश घाग, रंगनाथ पाटील, शशिकांत यादव, किशोर थोरात, महिला अधिकारी माया डोंगरे, अमोल इंगळे, भावेश घरत, विजय कुंभार, सर्फराज तडवी, रविंद्र साळुंखे या पोलीस पथकाने परिसरातील मिल्लतनगर, ममता हॉस्पीटलच्या फरहान हॉलकडे जाणाऱ्या रोडवर वेगवेगळ्या ठिकाणी साध्यावेषात सापळा रचून शिवानंद ज्ञानेश्वर कोळी (वय 24 राहुल रामदास शेजवळ, (वय 24 रा.सिहंस्थ नगर, पाथर्डी फाटा, नाशिक) या दोघांना पंचासमक्ष ताब्यात घेऊन गाडीची झडती घेतली असता गाडी मध्ये लहान मुलांच्या खेळण्यातील 500 रूपरेषा दराच्या नोटांचे 48 बंडल, एका आरोपीच्या ताब्यात 01 माऊझर पिस्टल व 01 जिवंत काडतुस असे मिळुन आले. सदर पिस्टल, काडतुस, नोटांचे 48 बंडल व इको स्पोर्ट कार असा एकुण सहा 33450,४५०/- रू. किमतीच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपी यांच्याविरूद्ध निजामपुरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे

सदर गुन्हयाचा तपास पोउनि रविंद्र पाटील करीत आहेत. नागरिकांना आवाहन करण्यात येते की,कोणीही अशा प्रकारच्या बनावट नोटा बदली करण्याच्या आमिषाला बळी पडु नये याबाबत माहिती मिळाल्यास तात्काळ संबंधीत पोलीस ठाण्यास किंवा गुन्हे शाखेस माहिती द्यावी असे आवाहन पोलिसांचेवतीने करण्यात आले आहे.

# कल्याणमध्ये भरली शासकीय योजनांची जत्रा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तालुक्यामध्ये १७ सप्टेंबर पासून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवाडा राबविण्यात येत असून त्याअंतर्गत पांदण रस्ते विषयक मोहिम व सर्वांसाठी घरे या उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या मोहिमेमध्ये जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या संकल्पनेतून शासकीय योजनांची जत्रा हा उपक्रम राबविण्याचे निर्देश होते. या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी सिध्दिविनायक मंदिर हॉल टिटवाळा या ठिकाणी शासकीय योजनांची जत्रा आयोजित करण्यात आली.

यामध्ये शासनाच्या विविध विभागांच्या सेवा एका छताखाली उपलब्ध करुन दिल्या गेल्या. सर्व शासकीय विभाग- महसूल विभाग, पंचायत समिती, भूमिअभिलेख विभाग, कृषी विभाग, कामगार कल्याण विभाग, अदिवासी विकास विभाग, आरोग्य विभाग या सर्व विभागांना सहभागी करून घेऊन शासकीय योजनांची जत्रा हा नाविन्यपूर्ण उपक्रम पार पाडण्यात आला. या उपक्रमांतर्गत अनेक लाभार्थीना लाभ




वाटप, विविध दाखले वाटप, आरोग्य तपासणी इ. उपक्रम राबविण्यात आले, तसेच शासनामार्फत पुरविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत कृषी विभागामार्फत महाविस्तार एआय अँप डाउनलोड करून देण्यात आले तसेच कृषी विभागाचे ठाणे युट्यूब हे चॅनेल सबस्क्राइब करून देण्यात आले.

पशुधन विभागामार्फत ७५ माहिती पुस्तिका तसेच शिक्षण विभागाने विविध योजनांची माहिती पुरविली. आरोग्य विभागामार्फत ८९ व्यक्तींची आरोग्य तपासणी करण्यात आली, आभा कार्डचा ५१ लाभार्थ्यांना लाभ पुरविण्यात आला, आयुष्यमान कार्डचा ३० लाभार्थ्यांना लाभ पुरविण्यात आला पशुधन विभागामार्फत ३५ लाभार्थीना लाभ देण्यात आला, महिला व बालविकास विभागामार्फत ३० लाभार्थीना लाभदेण्यात आला, कामगार कल्याण विभागामार्फत ६१ लाभार्थीना लाभ देण्यात आला, संजय गांधी योजनेअंतर्गत १८ लाभार्थीना लाभ देण्यात आला, पुरवठा विभागामार्फत २२ लाभार्थीना रेशन कार्ड वाटप करण्यात आले, ४७ उत्पन्न, वय, अधिवास व राष्ट्रीयत्व दाखले वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी तहसिलदार कार्यालया अंतर्गत सर्व मंडळ अधिकारी, सर्व ग्राम महसूल अधिकारी तसेच तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयातील वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमातून शासनाचा सकारात्मक व लोकाभिमूख चेहरा लोकांसमोर मांडला जात आहे. याचा लाभ तालुक्यातील असंख्य नागरिकांनी घेतला असल्याची माहिती कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळ यांनी दिली.

# अखेर वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षकांना मिळाले प्रमाणपत्र

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शिक्षकांना बारा वर्षे सेवा पूर्ण केली की वरिष्ठ वेतन श्रेणी व 24 वर्षे सेवा पूर्ण केली की निवड वेतन श्रेणी प्राप्त करण्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण करणे अनिवार्य आहे. सेवेत रुजू होतानाची परिस्थिती आणि त्यानंतर झालेली स्थित्यंतरे यासाठी स्वतःला सिद्ध करणे आवश्यक आहे. याकरीता राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था ठाणे (डायटचे ) प्राचार्य डॉक्टर संजय वाघ यांचे मार्गदर्शनाखाली ठाणे केंद्र समन्वयक भगवान खारके, डॉक्टर प्रभा खरटमोल, कल्याण समन्वयक डॉक्टर दिनेश चौधरी, कुमार पाटील यांचे नियंत्रणाखाली सर्व वर्गांचे दहा दिवसांचे वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण दि. ०२ जून ते १२ जून २०२५ या कालावधीत एम एच विद्यालय ठाणे, केसी गांधी विद्यालय कल्याण पश्चिम, बिर्ला कॉलेज चिकनघर या 03 केंद्रावर आयोजित करण्यात आले होते.

सदरच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थींना वेळेत उपस्थित राहणे गरजेचे होते. हा प्रयोग प्रथमतः या प्रशिक्षण वर्गाकरिता शासनाच्या वतीने राबविण्यात आला होता. वेळेचे महत्व व गांभीर्य लक्षात न घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींना या प्रशिक्षणापासून वंचितही राहावे लागलेले आहे. अशा नवीन अनुभवाच्या माध्यमातून प्रशिक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अखेर शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, अनेक शिक्षक संघटनांचे अध्यक्ष यांच्यावतीने वेळोवेळी केलेल्या पाठपुरामुळे आज अखेर यु आर सी एक व यु आर सी दोन मधील निवड वेतन श्रेणीचे 40 व वरिष्ठ वेतन श्रेणीचे 152 असे एकूण 192 शिक्षकांना प्रमाणपत्राचे वाटप विषयतज्ञ महेंद्र राऊत व संजय पाटील यांचे हस्ते ठाणे महानगरपालिका शाळा क्र 19, विष्णुनगर, ठाणे येथे दि.01 आक्टोबर 2025 रोजी करण्यात आले. यामुळे या शिक्षकांना दिलासा मिळाला असून त्यांनी समाध व्यक्त केले आहे.

# रायगड जिल्ह्यातील विकास कामे प्राधान्याने पूर्ण करावीत

## - खासदार सुनिल तटकरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** जिल्ह्यात अनेक विकास कामे सुरु असून सुरु असलेली विकास कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत,असे निर्देश खासदार सुनिल तटकरे यांनी जिल्हा नियोजन भवन हॉल येथे आयोजित विविध विषयांच्या आढावा बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उप वनसंरक्षक अलिबाग राहुल पाटील, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रविंद्र शेळके, उपमुख्य कार्यकारी सत्यजित बडे आदि उपस्थित होते.

खासदार सुनिल तटकरे म्हणाले की, वडखळ-अलिबाग रस्त्याचे काम, बेलकडे मार्गे अलिबाग-रोहा रस्त्याची प्रलंबित असलेली कामे तसेच रस्त्यावरील खड्डे भरण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. त्याचप्रमाणे राजेवाडी ते म्हाप्रळ या नॅशनल हायवेच्या कामामध्ये काही अडी-अडचणी असतील तर त्या सोडवून ते काम लवकरात लवकर पूर्ण करावे. मुंबई-गोवा हायवेवरील इंदापूर व माणगाव येथील बायपासची कामेपण सुरु करावीत. नातेखिंड ते रायगड हा रस्ता जवळपास पूर्णत्वाच्या मार्गावर असून तेथील कामे प्रलंबित असतील तर ती कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर द्यावा. मुरुड तालुक्यात मोठ्याप्रमाणावर पर्यटक येत असतात त्यामुळे साळाव ते मुरुड रस्ता तसेच रोहा ते आगरदांडा रस्त्याची कामे पूर्ण करावीत. तसेच जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे भातशेतीच्या झालेल्या नुकसानीचे कृषी अधिकारी व तलाठी यांनी संयुक्त पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात पुरेशा औषधसाठा उपलब्ध ठेवावा. सर्पदंश लस, डायलेलीसच्या सुविधाही उपलब्ध ठेवाव्यात.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024